...बादलसमध्ये झाला होता.

# 'अवताराची गोष्ट' सर्वोत्कृष्ट

## स्मिता तांबे सर्वोत्कृष्ट अभिनेत्री; अशोक लोखंडे अभिनेता

सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. १२ : महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्यात 'अवताराची गोष्ट' या चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा प्रथम पुरस्कार पटकावला; तर 'पितृऋण' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा द्वितीय पुरस्कार मिळाला. 'जयजयकार' हा चित्रपट तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला.

यशवंतराव चव्हाण चित्रपटातील भूमिकेसाठी अभिनेता अशोक लोखंडे यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला. ७२ मैल एक प्रवास या चित्रपटातील भूमिकेसाठी स्मिता तांबेला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देण्यात आला. प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरात आज ५१ वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा झाला.

या वेळी ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा यांना राज कपूर जीवन गौरव पुरस्काराने तसेच चित्रपट दिग्दर्शक मधुर भांडारकर यांना राज कपूर विशेष योगदान पुरस्काराने गौरवण्यात आले. ज्येष्ठ अभिनेत्री उमा भेंडे यांना चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्काराने; तर संगीतकार अजय-अतुल यांना चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्काराने गौरवण्यात आले.



राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्यात डावीकडून सांस्कृतिक मंत्री संजय देवतळे, दिग्दर्शक मधूर भांडारकर, मुंबईचे पालकमंत्री जयंत पाटील, ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा, अभिनेत्री उभा भेंडे- प्रकाश भेंडे आणि अजय-अतुल.

### पुरस्कारांचे मानकरी

**सर्वोत्कृष्ट कथा** : गायत्री कोलते (तानी),
**उत्कृष्ट पटकथा** : चिन्मय मांडलेकर आणि संजय जाधव (दुनियादारी)
**उत्कृष्ट संवाद** : नितीन दीक्षित (अवताराची गोष्ट)
**उत्कृष्ट गीते** : प्रकाश होळकर (टपाल)
**उत्कृष्ट संगीत** : अतुल लोहार (पिकुली)
**उत्कृष्ट पार्श्वगायक** : प्रसन्नजित कोसंबी (वाघी)
**उत्कृष्ट पार्श्वगायिका** : महालक्ष्मी अय्यर (टाइमपास)
**उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शन** : सुजित कुमार (अंगारकी)
**विशेष अभिनेता** : मोहन जोशी (रंगकर्मी)
**विशेष अभिनेत्री** : समिधा गुरू (कापूस कोंड्याची गोष्ट)
**उत्कृष्ट विनोदी अभिनेता** : सिद्धार्थ जाधव (टाइमपास)
**उत्कृष्ट विनोदी अभिनेत्री** : दीपाली सय्यद (माझ्या नवऱ्याची दुसरी बायको)
**उत्कृष्ट सहायक अभिनेता** : किशोर कदम (फॅण्ड्री)
**उत्कृष्ट सहायक अभिनेत्री** : सई ताम्हनकर (दुनियादारी)
**प्रथम पदार्पण अभिनेत्री** : श्रीया पिळगावकर (एकुलती एक)
**प्रथम पदार्पण दिग्दर्शक** : नागराज मंजुळे (फॅण्ड्री)
**सर्वोत्कृष्ट सामाजिक चित्रपट** : डॉ. प्रकाश बाबा आमटे
**सर्वोत्कृष्ट ग्रामीण चित्रपट** : ७२ मैल एक प्रवास

### मुख्यमंत्री अनुपस्थित

**राज्य शासनाच्या पुरस्कार सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि उपमुख्यमंत्री अजित पवार अनुपस्थित राहिले. यामुळे उपस्थित मंडळींमध्ये खेद व्यक्त करण्यात आला.**

**सर्वोत्कृष्ट सामाजिक चित्रपट दिग्दर्शक** : समृद्धी कोरे (डॉ. प्रकाश बाबा आमटे)
**सर्वोत्कृष्ट ग्रामीण चित्रपट दिग्दर्शक** : राजीव पाटील (७२ मैल एक प्रवास)